जागतिक बँक सहाय्यीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ करीता विभाग प्रमुख, नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी घोषित करणे...

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : नादेकृ-४६२४/प्र.क्र.८२/८-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक - ०३ सप्टेंबर, २०२४

**संदर्भ :-**

१) कृषि व पदुम विभाग शासन निर्णय, क्र.नादेकृ-४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.३० जून, २०२४

**प्रस्तावना :-**

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या यशस्वितेमुळे राज्याच्या इतर जिल्ह्यांमधील गावांचा या प्रकल्पामध्ये समावेश करण्याची मागणी विचारात घेऊन दिनांक २८ जून, २०२३ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार दिनांक ३० जून, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशीव, लातूर, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, जळगाव व नाशिक या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु.६००० कोटी (रुपये सहा हजार कोटी) किंमतीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

२. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी Project Concept Note व Preliminary Project Report केंद्र शासनाच्या आर्थिक कार्य विभागाकडे (Department of Economic Affairs) दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. केंद्र शासनाच्या आर्थिक कार्य विभागाच्या छाननी समितीच्या दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्ताव जागतिक बँकेकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या आर्थिक कार्य विभागाच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ च्या पत्रान्वये प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी जागतिक बँकेकडे सादर करण्यात आलेला आहे. जागतिक बँकेने सदर प्रस्ताव प्राप्त झाल्याबाबत कळविले असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

३. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ ची अंमलबजावणी विहित वेळेत व सुरळीत होण्यासाठी तसेच, प्रकल्पाचे कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे सुरु होण्याच्या दृष्टीने प्रकल्प संचालक, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना विभाग प्रमुख तसेच नियंत्रक अधिकारी व वित्त विशेषज्ञ ( उपसंचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा) यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :**

१. प्रकल्प संचालक, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५, वित्तीय नियमपुस्तिका १९७८, भाग-१, अ.क्र.१, नियम क्र.२ अन्वये प्रशासनिक विभागांस प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रकल्पाच्या टप्पा-२ करीता विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. प्रकल्प संचालक, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना या प्रकल्पाच्या टप्पा-२ करीता नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. वित्त विशेषज्ञ (उपसंचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा), नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई यांना प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. प्रकल्पाच्या टप्पा-१ साठी जो आहरण व संवितरण अधिकारी संकेतांक वाटप करण्यात आला आहे तो संकेतांक प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी वापरण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३००/का.१४३१, दि.१७.०५.२०२४ तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१९२/व्यय-१/२०२४, दि.०५.०६.२०२४ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९०३१७२८१५९८०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH BANSIRAO KARAD

Digitally signed by SANTOSH BANSIRAO KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=f981d5a9fec2e5d5dc36f39695b5f0e4ff5b340cd5420df7cbaa28990d692e36, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=90BBB9D3E7E74DE43F8070E2A9A65BFD42747F1995A4F22FDC0240939AAB0835, cn=SANTOSH BANSIRAO KARAD
Date: 2024.09.04 11:10:04 +05'30'

**( संतोष ब. कराड )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (कृषि ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प, मुंबई
७. संचालक (नियोजन व प्रक्रिया), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१२. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१३. उप मुख्य लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई

१४. कक्ष अधिकारी (कार्यासन व्यय-१/अर्थसंकल्प-१३/कोषा प्रशा ५/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. कक्ष अधिकारी (का.१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. कक्ष अधिकारी, कार्यासन २-अे कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई
१७. मा.मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती.